डॉ. मोहन नामदेव आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण

मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ क्रीडा संकुल
मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ०२०.
दूरध्वनी : २२८१ ७६९८, फॅक्स : २२८२ ६०२७
क्र. क्रीडा/2155 /2020
दि. 09.01.2020

प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था,
मुंबई विद्यापीठ.

विषय :- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार मुंबई विद्यापीठाच्या कक्षेतील क्रीडा स्पर्धा रचना, स्पर्धेची नियमावली, कार्यपध्दती या संदर्भात ३ ते ४ दिवसीय कार्यसत्राच्या आयोजनाबाबत.

महोदय /महोदय,

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा - २०१६, कलम २४ या अधिन राहून मुंबई विद्यापीठ अंतर्गत असलेल्या महाविद्यालयाची संख्या लक्षात घेता खेळाडूंना स्थानिक स्पर्धेमध्ये भाग घेता यावा, स्पर्धेचा आर्थिक भार कमी करणे, प्रवासाचा त्रास कमी करणे या दृष्टीने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापासून सर्व आंतर महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन चार विभागामध्ये करण्याची परवानगी मा. कुलगुरू यांनी दिली आहे. या संदर्भातील सर्व प्रक्रियांची माहिती सर्व संलग्नीत महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रमुख यांना ३ ते ४ दिवसाच्या कार्य शाळेमध्ये प्रस्तावीत केली जाणार आहे. तसेच कार्यशाळेमध्ये उपस्थित क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रमुख यांची मते घेवुन, शंकांचे निरसन करून अंतिम मसुदा तयार करण्यात येणार आहे. तसेच सदर कार्यशाळेत सहभागी होणारा क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रमुख प्रतिदिन रू.६००/- कार्यशाळा शुल्क म्हणून जमा करणार आहेत.

तरी कृपया आपले महाविद्यालय सदर निवासी कार्यशाळेचे आयोजन करण्यास इच्छुक असल्यास त्यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव दि.३० जानेवारी, २०२० पर्यत क्रीडा विभागाकडे पाठविण्यात यावा ही विनंती.

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण